CMYK

सुविचार

प्रयत्न करीत रहा कारण,
सुरुवात नेहमी कठीणच असते.

# दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com



तुळजापुरमधील वाहतुकीला शिस्त कधी लागणार? वाहतूक कोंडीने भाविक बेजार

पेज 4

■ धाराशिव ■ दैनिक ■ वर्ष 2 रे ■ अंक 178 ■ गुरुवार,दि .7 ऑगस्ट 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# धाराशिवचे दुय्यम निबंधक कार्यालय बुडाले अंधारात!

## यंत्रणा विजेवरच अवलंबून यंत्रणा,दस्त नोंदणीसाठी आलेल्या नागरिकांची फरपट

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील महत्त्वाच्या दुय्यम निबंधक कार्यालयात विजेचा लपंडाव सुरूच असून, वीज गेली की संपूर्ण यंत्रणा ठप्प होते. संगणकीकरण झालेली ही यंत्रणा इन्व्हर्टरशिवाय चालवायची प्रशासनाची कल्पनाशक्ती थक्क करणारी आहे. परिणामी दस्त नोंदणीसाठी आलेल्या नागरिकांना फेऱ्या माराव्या लागत असून, त्यांचा दिवसभर अक्षरशः छळ सुरू आहे. बुधवारी आलेल्या नागरिकांचा वेळ, पैसा वाया गेला.दिवसभरात दस्तनोंदणीसाठी आलेल्या लोकांना ताटकळत बसावे लागले. ना कुणी माहिती देणारा, ना जबाबदारी स्वीकारणारा. हे दृश्य पाहून प्रशासनाच्या कामकाजाची पोलखोल होते.



### तांत्रिक अडचण की बेजबाबदारपणा?

एका बाजूला डिजिटल इंडिया, ऑनलाइन व्यवहारांची घोषणा, तर दुसरीकडे वीज गेली की 'संपूर्ण यंत्रणा कोलमडते' हे चित्र प्रशासनाच्या गोंजारलेल्या घोषणांवर मोठा सवाल उभा करणारे आहे. हे केवळ अक्षम्य दुर्लक्ष नाही तर सामान्य जनतेच्या वेळेचा आणि श्रमांचा अपमान आहे. एका छोट्या इन्व्हर्टरसाठीही निधी नाही का? की नागरिकांची सोय प्रशासनाच्या अजेंड्यावरच नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### काम नाही, पण ताटकळा

दस्तनोंदणीसाठी आलेल्या एका नागरिकाने सांगितले, सुट्टी टाकून आलो, पैसे खर्चून आलो आणि इथे आल्यावर समजले की वीज नाही म्हणून काहीच होत नाही.महिनाभरात असा प्रकार ३वेळाघडलाआहे.

# पोलीस ठाण्यात तलवार घेऊन आरोपीची दहशत; अंमलदारावर हल्ला, एकजण गंभीर जखमी

आरंभ मराठी | भूम

भूम पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेल्या तीन पोलीस कॉन्स्टेबलवर आरोपी तरुणाने पोलीस ठाण्यातच तलवारीने वार केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि.५) दुपारी दोन वाजता घडली. यावेळी आरोपीने पोलीस ठाण्यातच तलवार घेऊन दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हा सर्व प्रकार भूम पोलीस ठाण्यात घडला. यावेळी तीन कॉन्स्टेबलवर आणि एका व्यक्तीवर आरोपीने तलवारीने वार केले. तसेच पोलीस ठाण्यातील काचेच्या वस्तूंची तोडफोड केली. या घटनेने भूम शहरासह परिसरात खळबळ उडाली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी शुभम संजय भोसले (वय २३ वर्षे, रा. कसबा भुम ता. भुम) याने दिनांक ५ ऑगस्ट रोजी दुपारी पावणे दोन वाजता तलवार घेऊन भूम पोलीस ठाण्यात प्रवेश केला. तिथे फिर्यादी कॉन्स्टेबल गणेश दत्तु पाटील (वय ३७ वर्षे) हे ठाणे अंमलदार म्हणून ड्युटीवर असताना आरोपीने दहशत निर्माण करुन तलवारीचा वार करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने तो वार हुकवल्यामुळे फिर्यादीचा जीव वाचला. यावेळी गणेश पाटील यांच्यासोबत असलेल्या दत्ता शिंदे याच्यावर आरोपी शुभम भोसले याने तलवारीने वार केले. यामध्ये दत्ता शिंदे हे गंभीर जखमी झाले.यावेळी आरोपीने पोलीस ठाण्यातील ठेबलवरील काच फोडून १०,००० रुपयांचे नुकसान केले. पोलीस ठाण्यात ड्युटीवर असलेले हवालदार कवडे व शिंदे यांनाही तलवारीने मारहाण करण्याचा प्रयत्न केला. यावेळी आरोपीने दहशत निर्माण करुन शासकीय कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करून जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशाचे उल्लघंन केले. याप्रकरणी फिर्यादी गणेश पाटील यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भूम पोलीस ठाण्यात भा.न्या.सं.कलम १०९, १३२, ११८(२), ३२४(४),१२५, ३५२, ३५१ (३) सह कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा,मपोका कलम १३५, सह फौजदारी दुरुस्ती कायदा कलम ७ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# लाडकी बहीण योजनेच्या हप्त्याचे वितरण झाले सुरू; रक्षाबंधन सणानिमित्त सरकारतर्फे बहिणींना ओवाळणी

आरंभ मराठी | धाराशिव

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जुलै महिन्यातील प्रलंबित हप्ता बुधवार (दि.६) पासून लाभार्थी महिलांच्या खात्यावर जमा करण्यास सुरुवात झाली. बुधवार आणि गुरुवार या दोन दिवसात सर्व लाभार्थी महिलांना हा हप्ता वितरित होणार आहे. रक्षाबंधन सणाच्या मुहूर्तावर हा हप्ता वितरित झाला असून, यामुळे धाराशिव जिल्ह्यातील साडेतीन लाख महिलांना दिलासा मिळाला आहे. रक्षाबंधन सणाच्या मुहूर्तावर राज्य सरकार जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे दोन हप्ते एकत्रितपणे वितरित करेल असे बोलले जात होते. मात्र, सरकारने केवळ जुलै या एकाच महिन्याचा हप्ता वितरित करण्यासाठी निधीची तरतूद केली होती. त्यामुळे प्रत्येकी १५०० रुपये वितरित करण्यात येत आहेत. मे आणि जून महिन्यात धाराशिव जिल्ह्यातील तब्बल चाळीस लाख महिलांना लाडकी बहीण योजनेतून सरकारने अपात्र केले आहे. जुलै महिन्यात देखील निकषात न बसणाऱ्या महिलांना हप्ता वितरित केला जाणार नाही. ज्या महिला पात्र असूनही त्यांना जून महिन्यात हप्ता मिळाला नाही त्या महिलांना जून आणि जुलै असे दोन महिन्याचे तीन हजार रुपये वितरित करण्यात येत आहेत.

# शहर खड्ड्यात..! धाराशिवमधील रस्त्याच्या विदारक प्रश्नावर आज रास्ता रोको; सत्ताधाऱ्यांच्या विरोधात संताप

आरंभ मराठी | धाराशिव

शहरातील अत्यंत वर्दळीचा आणि मुख्य मार्ग असलेल्या जिजाऊ चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या दुरावस्थेबद्दल सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगर पालिका प्रशासनाच्या विरोधात जनमत तयार झाले असून, शहरातील एकंदर सर्व रस्त्यांच्या प्रश्नांसाठी गुरुवारी (दि.७) सकाळी ११ वाजता रामकृष्ण परमहंस महाविद्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.मागील अनेक महिन्यांपासून शहरातील रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे, अपूर्ण कामे, जलनिस्सारणाचा अभाव आणि सत्ताधाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर धाराशिवकर आरपी कॉलेज समोर रस्ता रोको आंदोलन करणार आहेत.या रस्त्यावरच गेल्यावर्षी खड्ड्यांमुळे एका तरुणाचा दुचाकीवरून जाताना दुर्दैवी मृत्यू झाला होता. ही घटना शहरवासीयांच्या मनात आजही ताजी आहे. पण त्या घटनेनंतरही रस्ता दुरुस्तीच्या दृष्टीने कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नाही. नागरिक आणि विद्यार्थ्यांसाठी या मार्गाने प्रवास करणे दररोज जीवावर बेतत आहे.नूतन ाथमिक शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांची दशा न पाहण्यासारखी आहे. मात्र हे सगळं सुरू असताना सत्ताधारी स्वमग्न आहेत.बांधकाम विभाग आणि नगर पालिका प्रशासनावर सत्ताधाऱ्यांचा वचक राहिलेला नाही. सत्ताधारी गटाने प्रश्नांची सोडवणूक करण्याऐवजी वेळ मारून नेली जात आहे. परिणामी नागरिकांना हाल भोगावे लागत आहेत

### विद्यार्थ्यांचे आणि नागरिकांचे हाल

आरपी कॉलेज, भोसले हायस्कूल, नूतन प्राथमिक शाळा तसेच या भागातील क्लासेसच्या शेकडो विद्यार्थ्यांचा हा मुख्य मार्ग आहे. खड्ड्यांमुळे दुचाकीस्वार आणि पादचारी कायम धोक्यात असतात. पावसाळ्यात तर हा रस्ता अक्षरशः तलावात रूपांतरित होतो. गेल्या दोन दिवसांपासून पावसाने विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. शालेय विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचणे कठीण होत आहे. त्याशिवाय या मार्गावरून जाणाऱ्या रुग्णवाहिका, खासगी वाहने, व्यापारी वर्ग आणि नागरिकांचे रोजचे हाल होत आहेत.

### मंजूर असूनही रस्त्यांची कामे रखडली का?

शहरातील १४० कोटी रुपयांच्या मंजूर कामांपैकी ५९ रस्त्यांची कामे सत्ताधाऱ्यांनी का थांबवली, असा सवाल आंदोलक उपस्थित करत आहेत. राजमाता जिजाऊ चौक ते उंबरे कोठा व जिजाऊ चौक ते सांजा चौक रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज चौक, या रस्त्यांची कामे १० महिने होऊनही सुरू न होणे म्हणजे कारभाराचा बकाल नमुना आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत असून,आंदोलनात नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यातयेतआहे.

# जिल्ह्यात आज पावसाचा यलो अलर्ट

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यात आठवडाभर पावसाने विश्रांती घेतली होती. त्यानंतर मंगळवारपासून (दि.५) पुन्हा काही भागात पावसाला सुरुवात झाली. मंगळवारी दुपारी दोन वाजता धाराशिव शहरात दमदार पाऊस झाला.मंगळवारी मध्यरात्रीनंतर पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला आहे. हवामान विभागाने धाराशिव जिल्ह्याला आज पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. मंगळवारी मध्यरात्री सुरू झालेला पाऊस बुधवारी दुपारपर्यंत सुरू होता. हा पाऊस सर्वदूर पडला असून, जिल्ह्यातील आठही तालुक्यात दमदार पाऊस पडला. जून आणि जुलै महिन्यात पावसाने शेतकऱ्यांची निराशा केली. जिल्ह्यात जून आणि जुलै महिन्यात सरासरी २६४ मिमी पाऊस पडतो. परंतु, दोन महिन्यात केवळ २४० मिमी पाऊस पडला. हा पाऊस सरासरीच्या ९१% पडला. ऑगस्ट महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. निम्मा पावसाळा संपला तरी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पात अपेक्षित पाणीसाठी झालेला नाही. त्यामुळे ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात दमदार पावसाची अपेक्षा आहे. ऑगस्ट महिन्यात वातावरणात मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण झाली होती. वाढत्या उन्हामुळे तापमान ३६ अंशांपर्यंत गेले होते. त्यातच फुलोऱ्यात असलेल्या सोयाबीनला पावसाची गरज होती. मंगळवारी आणि बुधवारी झालेल्या दमदार पावसाने सोयाबीनसह ऊसाला देखील फायदा झाला आहे. पावसासाठी सध्या पोषक झालेली हवामानप्रणाली पुढील चोवीस तास अशीच राहणार आहे. त्यामुळे आज (दि.७) पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. धाराशिव जिल्ह्यातील बऱ्याच भागात ४० मिमी पेक्षा अधिक पाऊस पडला.




### आज पावसाचा जोर वाढणार

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेली चक्राकार स्थिती फक्त थोडीशी जमिनीवर आली आहे. त्याचवेळी या चक्राकार स्थितीकडे अरबी समुद्राकडून बाष्पयुक्त वारे येत आहेत. या दोन्हींच्या प्रभावाने कमी दाबाचे क्षेत्र किंवा पट्टा निर्माण झाला आहे. तसेच दोन्ही समुद्रातील बाष्पांचा पुरवठा या पट्ट्या भोवती होत आहे. त्यामुळे सोलापूर, लातूर, धाराशिव, नांदेड, बीड व पुण्याचा काही भाग तसेच कोल्हापूर, सातारा, सांगली या भागात जोरदार पाऊस होत आहे. हीच हवामान प्रणाली २४ तास आधी सक्रिय झाली यामुळे ७ तारखेचा पाऊस हा आपल्याला ६ तारखेला पहायला मिळत आहे. आज आणि उद्याही पावसाचा जोर असाच राहणार आहे.

**सूरज जाधव**
हवामान अभ्यासक, रुईभर.

# तुळजाभवानी मातेचे धर्मदर्शन व पेड दर्शन २० ऑगस्टपर्यंत राहणार बंद

आरंभ मराठी | तुळजापूर

श्री तुळजाभवानी मंदिरात सध्या जीर्णोद्धाराचे काम सुरू असून, पुरातत्त्व खात्यामार्फत देवीजींच्या सिंहाच्या गाभाऱ्यात दिनांक १ ऑगस्टपासून काम सुरू झाले आहे. सुरुवातीला मंदिर संस्थानने हे काम १० ऑगस्टपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता वर्तवली होती. त्यामुळे १० ऑगस्ट पर्यंत धर्मदर्शन आणि पेड दर्शन बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.मात्र आता हे काम २० ऑगस्टपर्यंत चालणार असून, त्यामुळे दिनांक २० ऑगस्ट पर्यंत श्री देवीजींचे मंदिर भाविकांसाठी धर्मदर्शन तसेच पेड दर्शन बंद असणार आहेत. या काळात मुखदर्शन, सिंहासन पूजा, अभिषेक पूजा व इतर धार्मिक विधी मात्र नियमितपणे चालू राहणार आहेत. याबाबत सर्व महंत, पुजारी, सेवेकरी व भाविकांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन मंदिर संस्थानतर्फे करण्यात आले आहे.







CMYK

# सृष्टीरूपी गुरु, त्याचे ध्यान धरू,एक झाड लावू,पृथ्वीवरी

**आरंभ** मराठीच्या रसिक वाचकांना नमस्कार. आज काव्यारंभ या सदराचे सत्ताविसावे पुष्प ! आज मी सौ.सविता सुखदेव माळी यांच्या कवितां विषयी लिहिणार आहे. सविता माळी यांचे शिक्षण लौकिक अर्थाने फक्त दहावी पर्यंत झालेले आहे पण व्यवहारात त्या अत्यंत चतुर आहेत. एक छोटा उद्योग किराणा दुकानत्यांनी त्यांच्या घरातच थाटले आहे. तसेच जिजाऊ नगर सह्याद्री बचत गटाचे अध्यक्ष पद त्यांच्याकडे आहे.अध्यात्माची त्यांना खुप आवडआहे. नुकतीच त्यांनी अगदी कमी वयात चारीधाम यात्रा पूर्ण केली आहे.सामाजिक कार्यात सहभागी होणे , महिलांचे संघटन करून समाजोपयोगी कामे करणे त्यांना आवडते.
भजन, भारुड, अनेक विषयांवर गाणे म्हणणे हा त्यांचा छंद आहे.
भजन स्पर्धेत त्यांना अनेक बक्षिसे मिळालेली आहेत तसेच त्यांना अभिनयाची पण आवड आहे.
अध्यात्मिक वाचन, काव्य लेखन, अभंग, पाळणे, चारोळ्या,गझल लेखनाची पण आवड आहे. त्यांचा सावित्रीच्या कविता हा प्रतिनिधिक कविता संग्रह प्रसिद्ध आहे.
सावित्रीबाई फुले मंडळ, अक्षरवेल साहित्य मंडळाच्या त्या सदस्य आहेत.
अशा या गृहिणी असुन आपला कवितेचा छंद आवडीने जोपासणाऱ्या कवयित्री माझी माय मराठी या कवितेत मराठीचा गौरव करताना म्हणतात,

महाराष्ट्राची तू आहे शान
तुझे किती करू मी गुणगान
तुलाच खरा राज्यभाषेचा मान
माझ्या जीवा तुझाच अभिमान !

मराठी भाषेबद्दलचे प्रेम त्यांच्या शब्दांमधुन ओसंडून वाहते.
आपली भाषा, आपली संतपरंपरा, गुरु याबद्दल कवयित्रीला विशेष आदर वाटतो,
त्या आपल्या गुरुपौर्णिमा या अभंगरचनेत म्हणूनच सहज लिहून जातात,

सृष्टीरूपी गुरु, त्याचे ध्यान धरू
एक झाड लावू, पृथ्वीवरी !

अभंगातून समाज प्रबोधन हा संतांचा उद्देश त्यांनी वृक्ष लागवडीचा संदेश आपल्या सुंदर रचनेतून लिहून खरा केलेला आहे. तर सहवास कवितेचा या कवितेत त्यांनी कवितेच्या सोबतीनं आपलं जीवन किती बहरलं, आपल्याल्या किती कौतुक मिळालं याचं वर्णन केलं आहे, त्या म्हणतात,

शब्द शब्द गुंफून,
जन्म तुझा झाला
शब्दांच्या पलिकडचे
उमगले मला!

कलियुगी सावित्री या कवितेत कवयित्रीनं आजच्या युगात सावित्रीबाईंनी दिलेल्या शिक्षणाच्या अमृताचा आज योग्य वापर करत नाहीत याची खंत व्यक्त केली आहे. तर पुस्तक या कवितेत त्या

शब्द शब्द जोडून पुस्तक घडलं
जीवनाचं रहस्य पुस्तकात दडलं
पुस्तकामुळे कळली, ज्ञानाई, तुकाई
जीवनाचं उत्तर त्यातच उलगडलं!

असं ग्रंथांचं महत्व मांडतात तर गझलचा शेर लिहिताना त्या

सुखी ठेवले मग प्रभू काय मागु
तुझे ध्यान हृदयी नको हाव
आता

अशी शब्दरचना करतात.
अशा या भक्तीरसाला आपल्या काव्यात जास्त प्राधान्य देणाऱ्या कवितांचा आपण रसास्वाद घेऊ या



डॉ. रेखा अनिल ढगे

काव्यारंभ

## पुस्तक

शब्द शब्द जोडून पुस्तक घडलं
जिवनाच रहस्य पुस्तकात दडलं,
पुस्तकामुळे कळली ज्ञानाई, तुकाई
जिवनाचे उत्तर त्यातच उलगडलं.

पुस्तकाचा मनाला असेल ध्यास
तेच करील तुमचा विकास,
एकातांतील रामबाण औषध
करत असते दुर्बुद्धीचा रहास.

पुस्तकांची मनी असावी तळमळ
तुमच्या कार्याचा सुटेल दरवळ,
ज्ञानाच्या सागराला येईल भरती
यशाचे शिखर मग वाटू लागेल
जवळ.

पुस्तक असते आयुष्याचे सोबती
जेवढा संग तेवढी मोठी प्रगती,
विज्ञान असो की प्रबोधन
ज्ञानात भर जगण्याला येते गती.

पुस्तकांशी नेहमी जुळवावे नाते
मनावरचे ओझे कमी होते,
हृदयाची भावना स्वरमय होते
जिवन सुंदर गाणे गाते.

## कलियुगी सावित्री..

तुझ्या जन्माचा सावित्री आज वाटतो
आम्हां हेवा,
तु जन्मली नसती तर,काय झाले
असते आमचे देवा.।।
ज्ञानाचा वसा देण्यासाठी तू,जिवाचे
केले होते रान
पण सावित्री या कलियुगात आहे
का,तुझ्या लेकीला भान.।।
तु दिलेलं वाघीनीचे दुध
पिऊन,झाल्यात शहाण्या सर्व,
दुधाने आले त्यांना बळ,मनाला
झालाय त्यांच्या गर्व.।।
कोणी बसल्या आटपाट नगरीच्या
कथा वाचत पुराणी,
तर कोणी झाल्या गुगल, इंस्टाग्राम
,फेसबुकच्या धनी.।।
साऊ तु दिलेलं अमृत कलियुगात
आता आम्हांला पचेना,
तु सांगितलेलं सत्य आमच्या मनाला
रुचेना.।।
पण मला वाटतं साऊ तु एकदा गुप्त
रुपाने पृथ्वीवर प्रगट व्हावं,
ज्ञानाचा चाललेला भडीमार तुझ्या
डोळ्यानेच पहावं.।।
पाहून तूच सत्य,असत्य
चुकलेल्यांना दे गिरवायला दुसरा
धडा,
कळू दे तुझ्या त्यागाचे महत्त्व
परोपकारी, निस्वार्थी, वागणं
रोकड.।।
जेव्हा तुझ्या लेकी चालतील
सावित्री तुझ्या स्वप्नातील मार्गाने,
तेव्हाच वाटेल सावित्री,तुझी जयंती
साजरी झाली..
तेव्हाचवाटेल...

## सहवास कवितेचा

कवितेचा केला मी संग
तुझ्या प्रेमात सदैव दंग,
नाही लागत कोणाची साथ
मी तुझाच पकडलाय घट्ट हात.

तुझं सामर्थ्य मोठं किती
तुझ्या येण्याने वाहवा होती,
तुझा जिव इवलासा
तरी कविच्या मनाचा दिलासा.

शब्द शब्द गुंफून
जन्म तुझा झाला,
शब्दांच्या पलीकडले
उमगले मला.

चंचल मनाची तु स्थिरता
रोमरोमांच करते कविता,
तुझा सुगंध भरला मनी
नाही उरली रिती पोकळी उणी.

क्षणात हसवते, क्षणात रडवते
काळजात घुसते, प्रेमात बहरते,
भावना खुलवते, सौंदर्य फुलवते
कविता सागरासम अथांग होते.

साधुसंताने स्वरात गाईले
तुझ्या स्वरुपाचे महिमान वहिले
मीरा,जणीने हृदयास धरिले
कविते तुझ्या जन्माचे सार्थक झाले.

## गुरू पोर्णिमा..

व्यास गुरू मानू. । पोर्णिमे निमित्त
गुरुचे पूजन । घडतसे.

आग्र स्थानी गुरू । माय बाप हेची
सर्व तीर्थ काशी । येती घरा.

सृष्टी रुपी गुरू. । त्याचे ध्यान धरु
एक झाड लावू. । पृथ्वीवरी.

ज्ञानाचे भांडार. । वाहणारा झरा
जगण्या आधार। आशिर्वाद

गुरुचे सामर्थ्य. । ज्ञानी होतो पूर्ण
तरतो सागर. । गुरुकृपे

गुरुच्या चरणीं. । सदा व्हावे लीन
उध्दरे जिवन.।सर्वकाळ.

## माझी माय मराठी..

महाराष्ट्राची तू आहेस शान
तुझे किती करु मी गुणगान
तुलाच मिळे राज्यभाषेचा मान
माझ्या जिवा तुझाच अभिमान.

सप्तसुरांनाही नाद तुझा जरी
गीतानांही ध्यास खरा मनी
गाणार्यांचा श्वास होऊन तरी
बहरते गंध होऊन मराठीच धनी.

तुकोबा अन् ज्ञानोबाने
मुक्ताई अन् जनाईने
हृदयी धरले तुला प्रेमाने
म्हणून तुझी पूजा करतोय
स्वाभिमानाने.

धर्म, ग्रंथ,जाती,पंथ
सर्वा ठायी वास्तव्य तुझे निवांत
दरवळतो तुझा सुगंध
संथ गतीने मार्ग तुझा मानतो तुला
भगवंत.

शिवरायांनी संस्कृती जपली ती
मराठी
मावळे घडले त्यातून ते मराठी
देशासाठी प्राण वेचले ते सर्व मराठी
त्यातून स्वराज्य स्थापन झाले
ते मराठी.

काना, मात्रा, वेलांटी,ऊकार
सौभाग्यवती जणू तरुण साकार
पारंपरिकतेची सजली ती मकार
आम्हांस दिलास दागिना करून
जिव उदार.

जिवनाचा भक्कम पाया तुच खरा
रसिक प्रेमी येतात तुझ्याच घरा
त्रिवार वंदन तुला, तुजविण नाही
थारा
पुनर्जन्म घेऊ आम्ही
तुझ्याचपुन्हाउदरा.

## भुजंग प्रयात..

लगागा लगागा...लगागा लगागा

नको अंत पाहू सख्या पाव आता
तुझी आस आहे स्वरुप दाव आता.

जगी खुप भक्ती तपस्वी किती पण
दिसेना कुणाचा खरा भाव आता.

तुला त्रास नाही कधी माहिती पण
कसे सोसले मग जिवा घाव आता.

तुझे कार्य आहे किती थोर देवा
कळेना जगाला तुझे नाव आता.

सुखी ठेवले मग प्रभू काय मागू
तुझे ध्यान हृदयीनकोहावआता.





सौ. सविता सुखदेव माळी
धाराशिव.

## वाईट माणसं

होय,वाईट माणसं
खरंच वाईट असतात
ठरवल्या प्रमाणे मुद्दाम
नेहमी वाईट वागतात

नजर वाईट माणसांची
वखवखलेली असते
नजरेत त्यांच्या सतत
वासना दडलेली असते

वर्तन वाईट भाषा वाईट
वैशिष्ट्ये वाईट माणसांचे
कार्यही वाईट त्या
वाईट स्वभावाच्या लोकांचे

व्यवहार व चारित्र्य विखारी
लक्षण ठळक वाईट लोकांचे
व्यक्तीमत्व ओंगळवाणे
दुष्ट विचारी माणसांचे

करु नये संगत कधी
वाईट लोकांसोबत
आर्थिक व्यवहार मुळीच नको
त्या दुष्ट लोकांसोबत

वाईट लोकांची सावली
आपल्यावर पडू न द्यावी
वाईटांनी जरी केली स्तुती
संगत त्यांची न धरावी

साखरेत घोळलं जरी
तुपात तळलं तरी
कडू स्वभाव तसाच कायम
वाईट माणसांचा

अवतीभवती आपल्या
अशा वाईटांचा गराडा
ओळखा वेळीच वाईटांच्या
निच कर्मांचा सपाटा

**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८.

# धाराशिव रोटरी क्लबने केली बक्षिसांची लयलूट




**आरंभ मराठी | धाराशिव**

जालना येथे पार पडलेल्या बक्षीस सोहळ्यात धाराशिव रोटरी क्लबने बक्षिसांची लयलूट केली.यामध्ये वेगवेगळ्या अव्हेनिव्हमध्ये उत्कृष्ट काम करून पुरस्कार प्राप्त केले.यामध्ये डी.जी.सायटेशन अवॉर्ड, प्रोजेक्ट, बेस्ट ऍडमिनिस्ट्रेशन, टी.आर. एफ कॉन्ट्रीब्युशन, हेल्थ कॅम्प काश्मीर अशा प्रोजेक्टमध्ये ३१३२ डिस्ट्रिक्टमध्ये धाराशिव रोटरी क्लबने बाजी मारली. गतवर्षीचे अध्यक्ष डॉ. श्रीराम जिंतूरकर, सचिव आनंद कुलकर्णी तसेच बोर्ड ऑफ डायरेक्टर यांच्या सहकार्याने हे शक्य झाले, असे गौरव उद्गार अध्यक्ष यांनी काढले. यावेळी पार पडलेल्या सोहळ्याला रोटरी प्रांतपाल सुरेश साबू, निर्मला साबू, प्रांतपाल २०२५-२०२६ चे सुधीर लातूरे, संगीता लातुरे, धाराशिव येथील संजय देशमाने, सुधाकर भोसले,लक्ष्मण वाघमारे, डॉ.मीना जिंतूरकर, रवींद्र साळुंके,अनार साळुंके, बाळासाहेब देशमुख यांच्यासह ११ जिल्ह्यातून आलेले सर्व रोटरी बांधव उपस्थित होते.

# अव्दैतवादी संत शिरोमणी नरहरी सोनार

**पंढरपूर** हे शिव उपासकांचे प्राचीन केंद्र. याच पंढरपुरात भक्त पुंडलिकाची मातृ -पितृ सेवा पाहून भगवान श्रीकृष्ण पांडुरंगाच्या रूपात येऊन युगे अठ्ठावीस विटेवरी उभे राहिले. हरिहर ऐक्य असलेल्या विठ्ठलाचे पुंडलिक भक्त झाले. पुढे याच पंढरपुरात संत नरहरी सोनार महान शिवभक्त ही होऊन गेले. त्यांच्या घरात शिवभक्तीची मोठी परंपरा होती. ते अन्य कुठल्याही देवाला मानीत नव्हते. शिव हेच सुखाचे आगर आहे. शिवनामातचं मांगल्याचे सार आणि सौंदर्य आहे.असे ते लोकांना सांगत असे. ते व्यवसायाने सोनार होते. व पंढरपुरात सोन्याचे व्यावसायिक म्हणून सुप्रसिद्ध होते. एकदा एक सावकार त्यांच्याकडे आले आणि विठ्ठलाच्या कमरेची सोनसाखळी बनवण्यास सांगितले. माप देऊन सावकार मोकळे झाले.दिलेल्या वेळेत नरहरी सोनारांनी कमरेची सोनसाखळी पूर्ण करून दिली. मात्र ती चार बोटांनी जास्त पडली. ऐन वेळेवर जास्त पडल्यामुळे सावकारांना राग आला. नरहरी सोनार हे कट्टर शिवभक्त आहे. त्यांनी मुद्दाम तर असे केले नसेल ना? अशी शंका सावकाराच्या मनात येऊ लागली. परंतु ती सोनसाखळी कमी करण्यासाठी परत आले. पुन्हा तो चार बोटांनी कमी करून दिली व विठ्ठलाला घालण्यासाठी परत मंदिरात आणली. आता मात्र अजूनही खूप लहान झाली होती. सावकार या मनस्तापामुळे क्रोधीत झाले.योग्य माप घेण्यासाठी तुम्ही स्वतः विठ्ठल मंदिरात जावे असे विनंती करू लागले. परंतु नरहरी सोनार शिवाच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही देवळात जात नव्हते. देवाचे तोंड सुद्धा बघत नव्हते, शिवाय अन्य देवाला मानीत नव्हते. नरहरी सोनार आपल्या कामात पारंगत होते. अशी चूक वारंवार होऊन लागल्यामुळे स्वतः चं खंत करू लागले.परंतु अशा प्रसंगी स्वतःच्या डोळ्यावर पट्टी बांधली. विठ्ठलाच्या कंबरीचे माप घेण्यासाठी त ` स्वतः मंदिरात गेले आणि माप घेऊ लागले. त्यांना तोच



निराळेच जाणवले,त्यांच्या हातांना कंप सुटला.मूर्तीला चाचपडत असताना एका हाताला कमंडलू तर दुसऱ्या हाताला त्रिशूल भासायला लागले. हात चाचपडत असताना मूर्तीच्या गळ्यात सर्पाचे भूजपत्र जाणवलं आणि म्हणू लागले. अरे,हा विठ्ठल नाहीचं! माझा प्राणप्रिय देव माझा समोर असताना मी डोळ्यांवर पट्टी कशी बांधू?असे म्हणत डोळ्यावरची पट्टी काढली. समोर बघताच चमत्कार झाला.साक्षात श्रीविठ्ठलाची मूर्ती दिसायला लागली. ती दिसताच पुन्हा नरहरी सोनारांनी डोळ्यावर पट्टी बांधली. कमरेचं माप घेऊ लागले. पुन्हा तो तोच प्रकार त्रिशूल, गजचर्म,सर्पभूषण भासू लागले. पुन्हा डोळ्यावरची पट्टी सोडली आणि समोर श्री विठ्ठलाची तेजस्वी मूर्ती दिसायला लागली. नरहरी सोनारांचे द्वैत व अहंकार गळून पडला. हरिहर ऐक्याची प्रचिती त्यांना आली. शिव आणि विष्णू एकच असून आपण उगाच गल्लत करून बसलो. हे त्यांना कळून चुकले. श्री विठ्ठलाची मूर्ती मोहितपणे न्याहाळू लागले. श्री विठ्ठलाच्या मस्तका वरील शिवलिंगाचे दर्शन त्यांना झालं. आणि संत नरहरी सोनार यांच्या डोक्यात प्रकाश पडला. या विश्वात एकच परमात्मा तत्व विविधतेने नटलेले आहे. तोच राम, तोच विष्णू, तोच कृष्ण, तोच शिव आहे. फरक एवढाच की, विविध रूप नावांनी तो नटलेला आहे.तत्व मात्र एकच आहे. नरहरी सोनारांचा द्वैत-अद्वैत भेद गळून पडला. एकतत्वाचा साक्षात्कार झाला. द्वैतभावाचे विसर्जन झाले. नरहरी सोनारांच्या हृदयरूपी गाभाऱ्यात विराजमान झालेले शिवतत्व आता हरीहराचे एकत्व असलेल्या श्री विठ्ठलाची एकरूप झाले. त्यांना शिवात विठ्ठल, आणि विठ्ठलात शिव दिसू लागले. म्हणून तर ते एका अभंग रचनेतून म्हणतात

' शिव आणि विष्णू एकचि प्रतिमा ऐसा
ज्याचा नेम सदोदित
धन्य ते संसारी नर आणि नारी
वाचे हरिहर उच्चारित
नाही पै भेद अवघा मनी अभेद
द्वेष द्वैत संबंध ऊरो नेदी
सोनार नरहरी न देखे द्वैत
अवघा मूर्तिमंत एकरूप '

पंढरपूरच्या मातीला देवाच्या रूपातही भेद केलेला आवडत नाही हे इथे स्पष्ट होते आणि तो भेद भगवंतांनी संत नरहरी सोनारांच्या माध्यमाने दूर केला.



**शशिकांत मधुकर तोटे**
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# भाषांमाजि साजिरी । मराठिया ।।

**फादर** स्टीफन हे इंग्लंड मध्ये जन्मलेले एक ख्रिस्ती मिशनरी होते. त्यांचा जन्म इ.स. १५४९ मध्ये इंग्लंडमध्ये तर मृत्यू इ. स. १६१९ मध्ये गोवा येथे झाला. १६ व्या शतकाच्या या काळात युरोपियन लोक व्यापारासाठी भारतात येऊ लागले होते. व्यापरासोबतच ख्रिस्ती धर्माचा प्रसार हा एक मोठा उद्देश होता. अनेक मिशनरींनी या कामी स्वतःला झोकून दिले होते. भारतात येऊन अनेक गोरगरीब भारतीयांना त्यांनी ख्रिश्चन धर्मात घेतले.
फादर थॉमस स्टीफन हे सुध्दा याच हेतूने भारतात आले परंतु इथे आल्यावर ते इथल्या मातीशी अखेरपर्यंत एकरूप होऊन राहिले. इथली संस्कृती अभ्यासली आणि ती आत्मसात सुद्धा केली. बायबल ग्रंथातील कथा जशास तश्या मराठीत भाषांतरित न करता त्यांनी इथल्या परंपरेत असलेली पुराणे जशा भाषेत मांडली आहेत तशा भाषेत , त्या शैलीत, त्याच स्वरूपात मांडल्या. त्याला नावही ख्रिस्तपुराण असे दिले. त्यातल्या कथा या मातीत , या प्रदेशात घडल्या असाव्यात अशा तऱ्हेने त्यांची मांडणी केली. त्यामुळे त्या इथल्या लोकांना अधिक भावल्या. जवळच्या वाटल्या. इथे त्यांचा उद्देश ख्रिस्ती धर्म लोकांना समजावून देणे आणि त्याचा अधिकाधिक प्रसार करणे हा असला तरी त्यांच्या या लेखनातून मराठी भाषा आणखी समृद्ध झाली. त्यात नव्या साहित्याची भर पडली हे महत्वाचेच. त्यात वापरलेली भाषा ही संतांच्या तोडीची आहे. अभंग , ओव्या यामध्ये वापरली जाणारी काव्यरचना आहे. यासाठी निश्चितच त्यांनी आपल्या भक्ती संप्रदायाचे , संत साहित्याचे सूक्ष्म अध्ययन केले असावे. त्याशिवाय इथले शब्द इतक्या सुंदर मांडणीत गुंफणे कसे होणार? त्यांनी मराठी आणि विशेषतः कोकणी भाषेचा सखोल अभ्यास करून कोकणी भाषेचे व्याकरण लिहिले. हे त्या भाषेचे छापले गेलेले पहिले व्याकरणाचे पुस्तक आहे.
ख्रिस्तपुराण हे मराठी भाषेत असले तरी त्या काळी देवनागरी छपाई पद्धती विकसित झालेली नसल्याने ते रोमन लिपीत छापले गेले. त्याकाळी त्याच्या तीन आवृत्या निघाल्या होत्या.
जसे योगीराज ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीची सुरुवात करताना अशी केली आहे –
ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरुपा ।।१।।
तशी ख्रिस्त पुराणाची पहिली ओवी अशी आहे
ओम नमो विस्वभरिता। देवा बाप्पा सर्व समर्था।परमेस्वरा सत्यवंता। स्वर्ग प्रथुवेचाआ रचणारा।।
हे वाचल्यावर एखाद्या इंग्रजी व्यक्तीने केलेली ही रचना असेल असे वाटत नाही.फादर थॉमस स्टीफन यांची एक सुप्रसिद्ध रचना ज्यातून त्यांनी मराठी भाषेचा खूप मोठा गौरव केला आहे ती सहावीच्या पुस्तकात अभ्यासण्यासाठी दिलेली आहे. मराठी भाषेने नुकताच अभिजात दर्जा प्राप्त केला आहे. त्यात काही योगदान निश्चितच फादर स्टीफन यांचेही आहे. सोळाव्या , सतराव्या शतकातील मोजक्या दर्जेदार साहित्यामध्ये त्यांचे साहित्य आहे. एका परदेशी नागरिकाने मराठी भाषेचा इतका गौरव करावा हे सर्व मराठीजनांना अभिमानास्पद आहे.
फादर मराठी भाषेचा गौरव करताना ज्या उपमा, उपमेय, दृष्टांत आणि उदाहरणांचा उल्लेख करतात ते निव्वळ अप्रतिम आहे. ही रचना ओवीबद्ध आहे.''जैसी हरळांमाजी रत्नकिळा । रत्नामाजी हिरा निळा ।तैसी भाषांमाजी चोखळा । भाषा मराठि ।।
पहिल्या ओवीत ते म्हणतात जगातल्या सर्व तेजोमय वस्तूंमध्ये रत्नांचे तेज सर्वश्रेष्ठ, सुंदर , देखणं आहे, त्याची तुलना इतर तेजाशी होऊ शकणार नाही. रत्नकीळा हा सुंदर शब्द त्यांनी तिथे योजला आहे. जगात अनेक प्रकारचे मौल्यवान रत्ने आहेत. हिरे , माणिक, मोती , पाचू , सोने, चांदी इत्यादी. पण या सर्वांमध्ये हिरा सर्वात मौल्यवान आहे. त्याची तोड इतर कुणाला येत नाही. आणि त्यातही पुन्हा निळ्या रंगाचा हिरा, 'निलरत्न' तो तर अनमोलच. तशी सर्व भाषांमध्ये मराठी भाषा सर्वश्रेष्ठ आहे. उत्तम आहे, समृद्ध आहे. मराठी संतांनी, कवींनी तर मराठीचा गौरव केला आहेच. पण एका इंग्रजी , ख्रिस्ती धर्मगुरू कडून होणारा हा गौरव अधिकच छाती फुलवणारा आहे.
जैसी पुष्पांमाजि पुष्प मोगरी । की परिमळांमाजि कस्तुरी। तैसी भाषांमाजि साजिरी । मराठिया ।।
जसे या जगात अनेक प्रकारची फुले आहे. ती सर्वच सूंदर , सुगंधित आहे. निसर्गाने फुलांसारखी नाजूक, सुंदर वस्तू बनवून या पृथ्वीला अधिकच सुशोभित केले आहे. या सर्व फुलांमध्ये मोगरा सर्वश्रेष्ठ. त्याच देखणं, नाजूक, छोटंसं रूप, सफेद दुधी रंग आणि त्याचा अप्रतिम सुगंध .. अहाहा .. अद्भुत ..
मोगऱ्याचा गजरा लावण्याचा मोह म्हणूनच तर स्त्रियांना आवरत नाही.परिमळ म्हणजे सुगंध .. जगात जेवढ्या सुगंधित वस्तू आहेत त्यात विविध प्रकारची फुले, चंदन , माती, विविध रस, फळे अशा अनेक सुगंधित गोष्टी आहेत. पण या सर्वांमध्ये कस्तुरीचा सुगंध सर्वात दर्जेदार, सर्वोत्तम आहे. कस्तुरीमृग नावाची हरणाची एक प्रजाती आहे. तिच्या नाभीजवळ एक ग्रंथी असते तिथून एक सुगंधी द्रव पाझरतो. हे हरीण दुर्मिळ आहे आणि गुढही आहे. रामायणात सीतेला अशाच कस्तुरीमृगाचा मोह झाला आणि रामायण घडले. ही कस्तुरी सुंदर, सुगंधित असते. कवी म्हणतात मराठी भाषाही अशीच आहे. सर्वांना आनंदित करणारी. मोहित करणारी. बहुआयामी, शब्दसंपत्तीने परिपूर्ण.
पाखिया माजी मयोरू । वृखियांमाजि कल्पतरू ।भाषांमाजि मानु थोरु । मराठियेसी ।।
पुढे आणखी उपमा देताना ते म्हणतात – जसे सर्व पक्षांमध्ये मोर सर्वात श्रेष्ठ, सुंदर आहे. त्याच्या शरीरावर असलेली विविध रंगसंगती आकर्षक आहे. त्याच्या चालण्याचा डौल मोहक आहे. त्याचा आवाजही सुरेल आहे. तो पिसारा फुलवून नाचतो तेव्हा तर स्वर्गीय आनंदाचीच अनुभूती येते.
दुसरी उपमा आहे कल्पतरुची. कल्पतरू हे झाड आपल्या मनात येईल ती इच्छा पूर्ण करते असे म्हणतात. म्हणजे ते स्वतः समृद्ध आहे म्हणून दुसऱ्यांना देऊ शकते. तशीच सर्व भाषांमध्ये मराठी भाषा अशीच समृद्ध आहे. सर्व प्रकारच्या भावना, विचार , आनंद , दुःख , सल , वेदना, हर्ष , नवल , विरह ,शृंगार असे सर्वकाही या भाषेतून सखोल आणि दर्जेदारपणे, जशास तसे मांडता येते. शब्द कमी पडत नाहीत. अशी ही थोर भाषा आहे मराठी. तारांमध्ये बारा रासी । सप्तवारांमाजि रवी शशी। ।या दीपाचेआ भाषांमध्ये तैसी । बोली मराठिया ।। ''
राशींची नावे प्राचीन भारतीय ज्योतिष शास्त्रातील १२ तारकासमूहांवरून पडली आहेत. प्रत्येक तारकासमूहाचे नाव त्याच्या आकाशातील विशिष्ट आकारमानावरून पडले. प्रत्येक तारका समूहातील सर्वात मोठ्या ताऱ्याच्या आकारावरून. वारांची नावे ही सूर्यमालेतील ग्रहांच्या नावावरून पडली. कवी म्हणतात जसे अनेक तारकांमध्ये १२ राशी श्रेष्ठ आहेत, वारांमध्ये रविवार आणि शशी म्हणजे सोमवार श्रेष्ठ आहे. तशी जगातील अनेक भाषांमध्ये मराठी श्रेष्ठ भाषा आहे. या रचनेत फादर थॉमस स्टीफन यांनी मराठी भाषेला अनेक उपमा देऊन गौरविले आहे. रत्नकीळा, निलरत्न, मोगरा, कस्तुरी, मयूर, कल्पवृक्ष, १२ राशी, रवी-शशी अशा आपापल्या स्थानी सर्वश्रेष्ठ असणाऱ्या गोष्टींची उपमा मराठी भाषेला देऊन तिचा सन्मान केला आहे. तिची थोरवी गायली आहे. आपण मराठी भाषिक , या मराठी माय बोलीचे सुपुत्र आहोत . तिचा गौरव कमी होऊ नये उलट तो अधिकाधिक कसा वाढत जाईल, ती कशी उज्वल होईल, आणखी समृद्ध होईल, जगात तिचा सन्मान कसा वाढेल यासाठी सतत जागृत आणि प्रयत्नशील असायला हवे. मराठीत बोलण्यात, लिहिण्यात संकोच , कमीपणा न मानता अभिमानाने तिचा वापर केला पाहिजे. परकीय , परभाषीय लोकांना तिचे महत्व कळले जे कदाचित आपल्याला अजून कळले नाही. ते लवकरच समजून घेण्यासाठी पुढे यावे. तिला आजवर अनेक संतांनी, लेखक, कवी , विचारवंतांनी समृद्ध केले आहे. ते टिकवणं , वृद्धिंगत करणं ही पुढच्या पिढ्यांची जबाबदारी आहे. ती आपण सर्वांनी मिळून निश्चितच पार पाडुया.
जात मराठी, धर्म मराठी।। शान मराठी। अभिमान मराठी।।
सजग रहा। सहज रहा।




**राम आरडले.**
९४२३८२७२३६

अशी बोलते कविता

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# रेशनचे पावणेतीन लाख लाभार्थी अद्यापही ई-केवायसीविना

## वर्षभर मुदतवाढ देऊनही २३ टक्के लाभार्थ्यांची केवायसी प्रलंबित ; आणखी मुदतवाढ देण्याची मागणी



आरंभ मराठी | धाराशिव

जिल्हा पुरवठा विभागाने ई-केवायसी करण्यासाठी ठरविलेली डेडलाइन संपुष्टात आल्यानंतर २ लाख ७० हजार ६४३ नागरिकांची ई-केवायसी अद्यापही बाकी आहे. ई-केवायसी नसल्याने या लाभार्थ्यांना मिळणाऱ्या धान्याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. दुसरीकडे अनेक ठिकाणी धान्य वितरणासाठी वापरण्यात येणाऱ्या ई-पॉस मशीनला रेंज मिळत नसल्याने लाभार्थी आणि रेशन दुकानदार यांच्यात खटके उडत आहेत. धाराशिव जिल्ह्यात ११ लाख ९१ हजार ९९६ लाभार्थी आहेत. त्यापैकी ९ लाख २१ हजार ३५३ नागरिकांनी ३१ जुलै पर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे. तर २ लाख ७० हजार ६४३ लाभार्थी अजूनही केवायसी करणे बाकी आहेत. जिल्ह्यात केवायसीची प्रक्रिया ७७ टक्के झालेली आहे. त्यामुळे अजूनही २३ टक्के नागरिकांची केवायसी होणे बाकी आहे. लाभार्थ्यांना धान्य वितरण करण्यासाठी शासनाकडून ई-पॉस मशीनचा पुरवठा करण्यात आला आहे. मात्र, या ई-पॉस मशीनला रेंज मिळत नसल्याने मशीनवर लाभार्थ्यांची नावे अन् आकडेवारी दिसत नाही. यामुळे रेशन दुकानदारांना धान्य वितरण करताना अडचणी निर्माण होतात. याउलट लाभार्थी याबाबत अनभिज्ञ असल्याने त्यांचे दुकानदारासोबत खटके उडत आहेत. यामुळे दुकानदार चांगलेच त्रस्त झालेले आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत कमी उत्पन्न असलेल्या नागरिकांना दर महिन्याला मोफत धान्याचा लाभ दिला जातो. हाताच्या अंगठ्याच्या ठशाचा दाखला घेतल्यानंतरच लाभार्थ्याला धान्य वितरित केले जाते. दुसरीकडे, ई-केवायसी न झाल्यास सप्टेंबरपासून हा लाभ दिला जाणार नाही, असा आदेश पुरवठा विभागाने जाहीर केला आहे. तर केवायसीपासून वंचित लाभार्थी शासनाकडून धान्य मिळणार नसल्याने पुन्हा केवायसीला मुदतवाढ कधी मिळणार याची वाट पाहत आहे.

### मुदतवाढीकडे नागरिकांचे लक्ष

अद्यापही पावणे तीन लाख नागरिकांची ई-केवायसी प्रलंबित आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी संबंधितांना ३१ जुलैपर्यंत मुदत दिली होती. परंतु, दरम्यान सर्व्हर डाउन झाल्यामुळे रेशन दुकानदारांकडे चकरा मारूनही ई-केवायसी करणे शक्य झाले नाही. ई-केवायसी करण्याची मुदत संपून सात दिवस झाले तरीही मुदतवाढीबाबत सरकारकडून जिल्हा पुरवठा विभागाला स्पष्ट निर्देश प्राप्त झालेले नाहीत. मुदतवाढ हा केंद्र सरकारच्या अखत्यारितला विषय असल्याने राज्य सरकारला केंद्राकडे पाठपुरावा करावा लागणार आहे. तसेच ई-केवायसी करण्यात येणाऱ्या अडचणींसाठी स्पष्टीकरण देणेही आवश्यक आहे. आतापर्यंत अनेकदा मुदतवाढ देण्यात आली असून, यंदाही मुदतवाढ होणार का, याकडे संबंधित नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### जिल्ह्यातील केवायसी ची आकडेवारी

| तालुका | लाभार्थी | केवायसी न केलेले | टक्केवारी |
|---|---|---|---|
| धाराशिव | २८०९२७ | ५३१६९ | ८१% |
| कळंब | १६३२५९ | ४८०२ | ७९% |
| वाशी | ७३२२३ | १६१८४ | ७८% |
| भूम | १०७७२५ | २४४३२ | ७७% |
| तुळजापूर | १७४३८१ | ४०९६८ | ७६% |
| उमरगा | १८३५८७ | ४५५७८ | ७५% |
| परंडा | ११९१७५ | ३०२९८ | ७५% |
| लोहारा | ८९७१९ | २५२१२ | ७२% |
| एकूण | ११९१९९६ | २७०६४३ | ७७% |

## विद्युत सहायक पदावर नियुक्ती, मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते सत्कार



आरंभ मराठी | धाराशिव

तालुक्यातील तुगांव येथीलकुणबी सम ाजाच्या आरक्षणातून विद्युत सहायक या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल शेतकरी धर्मराज शेंडगे यांचा मुलगा ओम शेंडगे आणि बालाजी काशिनाथ भुतेकर यांचा मुलगा प्रणव बालाजी भुतेकर यांचा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. मनोज जरांगे पाटील यांच्या प्रयत्नामुळे मराठा समाजातील कुणबी नोंदी शोधल्या जात आहे त्याचा फायदा गरीब होतकरू कुटुंबातील मुलांना शिक्षण तसेच नोकरीसाठी होत आहे. तुगाव येथील अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असलेल्या आणि पिढ्यानपिढ्या शेती करणाऱ्या कुटुंबातील दोन्ही मुलांची महावितरणमध्ये विद्युत सहायक या पदावर नियुक्ती झाली. या नियुक्तीबद्दल धाराशिव दौऱ्यावर आलेले संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तसेच भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपस्थित तुगाव येथील मराठा सेवक सुशील गडकर यांच्याकडूनही या दोघांना पुढील नौकरी आणि शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## नळदुर्ग बसस्थानकावर ज्येष्ठ महिलेचे तीन लाखांचे दागिने लुटले

**नळदुर्ग** – येथील बस स्थानकावर बसमध्ये चढत असलेल्या ज्येष्ठ महिलेचे तब्बल तीन लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना घडली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी कनिजफातेमा जिलेलाही शाहीन (वय ७१ वर्षे) या दिनांक ४ ऑगस्ट रोजी नळदुर्ग बसस्थानकावर सोलापूर ते नळदुर्ग बसमध्ये प्रवास करत होता. त्यावेळी त्यांच्या बॅगची चैन उघडून बॅगमधीलस ७५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, घड्याळ व रोख रक्कम ३,००० रुपये असा एकुण ३,०३,००० रुपये किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले. कनिजफातेमा शाहीन यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## स्टुडिओचे काम करण्याच्या बहाण्याने आठ लाखांची फसवणूक

आरंभ मराठी | धाराशिव

स्टुडिओचे काम करण्यासाठी आठ लाख रुपये घेऊन काम न करता आर्थिक फसवणूक केल्याची घटना धाराशिव शहरातील व्यापाऱ्यासोबत घडली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी सचिन मिस्त्री, पुनम मक्तेदार, राहुल मक्तेदार, अभिषेक मोकाशे, विवेक सुरवसे (सर्व रा. पुणे) यांनी दिनांक १० फेब्रुवारी २०२५ ते २४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान एचडीएफसी बँक धाराशिव येथे फिर्यादी आशिष ब्रिजलाल मोदाणी (वय ४९ वर्षे) यांना तुमचे टीग्लॉस स्टुडीओची काम करुन देतो असे म्हणून आरोपींनी फिर्यादी कडून आरटीजीएस च्या माध्यमातुन ऑनलाईन ८,००,००० रुपये घेतले. परंतु, त्याचे कुठल्याही कोटेशन प्रमाणे काम न करता पैसे परत न देता फिर्यादीस विश्वासात घेवून काम करतो असा विश्वास दाखवून फसणुक केली. याप्रकरणी आशिष मोदाणी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे आनंदनगर येथे भा.न्या.सं.कलम ३१६(२), ३१८(४), ३(५), अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## विजयाबाई स्वामी यांचे निधन

आरंभ मराठी | येणेगुर



येणेगुर येथील विजयाबाई आण्णय्या स्वामी (वय वर्ष ७६) यांचे बुधवारी (दि.६) दुपारी तीन वाजता हृदयविकाराने गुलबर्गा येथे खाजगी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्यावर आज (दि.७) सकाळी जंगम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यांत येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भाऊसाहेब सहकारी साखर कारखाना समुद्राळचे संचालक योगीराज स्वामी यांच्या त्या मातोश्री होत.

## दिवंगत लहान भावाच्या स्मरणार्थ मोठ्या भावाने गावच्या शाळेला दिली २५ हजार रुपयांची देणगी

आरंभ मराठी | कळंब



अमरसिंह कमलाकर पाटील या लहान भावाच्या स्मरणार्थ मोठ्या भावाने गावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटशिरपुरा या शाळेला शाळेच्या सुशोभीकरणासाठी २५ हजार रुपयाची देणगी दिली. पुणे येथे हायटेक सर्विसेस या कंपनीत प्रोडक्शन विभागात कार्यरत असलेला मोठा भाऊ प्रमोद कमलाकर पाटील याने आपला लहान भाऊ अमरसिंह कमलाकर पाटील याची आठवण म्हणून त्याच्या स्मरणार्थ शाळेतील स्टेजच्या सुशोभीकरणासाठी २५ हजार रुपयाची देणगी देऊन सहकार्य केले आहे. या देणगीमुळे आपल्या भावाचे स्मरण सतत आमच्या कुटुंबाला व गावातील प्रत्येक नागरिकाला राहावे या उदात्त उद्देशाने ही देणगी दिली. या देणगीबद्दल शाळेचे मुख्याध्यापक बाळकृष्ण तांबारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुशील गायकवाड, उपाध्यक्ष तैमुरलंग शेख व शाळेतील शिक्षक श्रीकांत तांबारे, अमोल बाभळे, सचिन तामाने, शहाजी बनसोडे, राजाभाऊ शिंदे, लिंबराज सुरवसे, प्रमोदिनी होळे, रंजना थोरात तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी पाटील कुटुंबाचे आभार मानले.

## आळणी सरपंच प्रमोद वीर यांच्या पाठपुराव्याला यश

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव तालुक्यातील आळणी या गावात गेल्या अनेक दिवसापासून वानर /माकड वन्यजीव या प्राण्यापासून शेतकऱ्यांना अनेक त्रासाला सामोरे जावे लागत होते. वानर/ माकड यांच्यामुळे गांव व परिसरात शेती पिकाचे नुकसान,घरांचे नुकसान,पत्रांचे नुकसान, सोलार, डिश, नळ,पाण्याची टाकी मानव जीवितेला धोका पोहोचवणे असे भयानक त्रासाला येथील नागरिक सामोरे जात होते. परंतु ही बाब लक्षात येताच आळणी गावचे सरपंच प्रमोद नेताजी वीर यांनी व गावातील लोकप्रतिनिधी यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून वनविभागाच्या माध्यमातून हे प्राणी वनविभागापर्यंत पोहोच केले. परंतु या वानर/ माकडाचा वावर काही कमी होत नव्हता दिवसेंदिवस वाढतच होता ही बाब लक्षात येताच गावचे सरपंच वीर यांनी तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना एका निवेदनाद्वारे ही बाब लक्षात आणून दिली.आमदार राणा दादानी तात्काळ वनमंत्री गणेश नाईक साहेब यांची मंत्रालयात भेट घेऊन मौजे आळणी ता.जि.धाराशिव येथील वानर हे वन्यजीव पकडून नैसर्गिक अधिवासात सोडणे बाबत विनंती केली. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने मंत्री महोदय वनमंत्री गणेश नाईक साहेब यांनी क्षणभर विचार न करता शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय असल्यामुळे तात्काळ अधिकाऱ्यांशी चर्चा करून ही समस्या सोडविण्याचे आदेश देण्यात आले व अमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. या निर्णयामुळे आमदार राणाजगजितसिंह पाटील, आळणी गावचे सरपंच प्रमोद नेताजी वीर यांच्या माध्यमातून हा प्रश्न मार्गी लागला असून गावातील शेतकरी व नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

## पक्षाच्या जीवावर पाच वेळा उमेदवारी मिळवणाऱ्यांना जनता माफ करणार नाही

### डॉ.प्रतापसिंह पाटील यांचा राहुल मोटे यांच्यावर निशाणा

आरंभ मराठी | धाराशिव



ज्यांना पक्षाने ५-५ वेळा उमेदवारी दिली त्यांनी पक्षाशी गद्दारी केली असून, भूम-परांडा-वाशी विधानसभा मतदारसंघात काही पदाधिकाऱ्यांनी, नेत्यांनी पक्षांतर केले असले तरी मतदारांवर त्याचा फारसा परिणाम होणार नाही. या मतदारसंघातील जनता ही स्वाभिमानी असून, गुत्तेदारांची टोळी जरी इतर गटात प्रवेश करत असली, तरी खरे मतदार मात्र अजूनही शरद पवार यांच्यासोबतच आहेत, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केली.माजी आमदार राहुल मोटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केला. या पार्श्वभूमीवर डॉ. पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे तीव्र प्रतिक्रिया नोंदवली. ते म्हणाले, ३५ हजार मतांनी पराभूत झाल्यानंतरही पवार यांनी त्या व्यक्तीस पुन्हा उमेदवारी दिली. इतर कुणालाही तिकीट दिले असते, तर ती जागा निश्चितच पक्षाच्या ताब्यात राहिली असती. पक्षाच्या उपकारांची जाण न ठेवणाऱ्यांबद्दल काय बोलावे. माजी आमदाराची खरी पात्रता आणि मतदारांशी त्यांचा खरा संपर्क येणाऱ्या निवडणुकीत स्पष्ट होईल, असा टोलाही त्यांनी लगावला. भूम, परांडा आणि वाशी या तिन्ही तालुक्यातील प्रत्येक राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार आहे. प्रत्येक निवडणूक ताकतीने लढवली जाईल,असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेतून ३५ लाखांची मदत

### जिल्ह्यातील २८ विद्यार्थ्यांच्या पालकांना मिळाली आर्थिक भरपाई

आरंभ मराठी | धाराशिव

राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत धाराशिव जिल्ह्यातील इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अपघातामुळे झालेल्या मृत्यू, गंभीर दुखापत अथवा शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. दिनांक १६ जुलै २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत एकूण २८ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या प्रस्तावांनुसार विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बँक खात्यांवर ३५ लाख १८ हजार ३०३ रुपये इतकी रक्कम ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यात आली.

#### मंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावांचा तपशील

**मृत्यूप्रकरणे २२ प्रस्ताव**
**रक्कम : ३३,००,०००/- रुपये.**
**शस्त्रक्रिया ५ प्रस्ताव**
**रक्कम : १,८८,३०३/- रुपये.**
**अवयव निकामी होणे १ प्रस्ताव**
**रक्कम : ३०,०००/- रुपये.**


#### तालुकानिहाय प्रस्ताव वितरण

**धाराशिव ८, तुळजापूर ८, उमरगा ५**
**कळंब ३, भूम ३, परांडा १, लोहारा व वाशी ०**

या योजनेचा मुख्य उद्देश अपघातग्रस्त विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक आधार देणे हा आहे. सन २०१२-१३ पासून सुरु असलेली ही योजना सन २०२२ मध्ये सुधारित करण्यात आली असून, त्याअंतर्गत सानुग्रह अनुदानाच्या रकमेची मर्यादा वाढविण्यात आली आहे. दरम्यान, १० जुलै २०२५ रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय समितीच्या नव्या बैठकीत आणखी २९ नवीन प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रस्तावांसाठी एकूण ३३ लाख ४० हजार ५५९ रुपये इतका निधी लवकरच पालकांच्या खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे अशी माहिती संतोष माळी, उपशिक्षणाधिकारी (योजना), जिल्हा परिषद धाराशिव यांनी दिली.

## मुरुम महसूल मंडळातील शेतकऱ्यांच्या मदतीसाठी राष्ट्रवादीचा पुढाकार

आरंभ मराठी | उमरगा



सन २०२४ मध्ये उमरगा व लोहारा तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने शासन मदत मिळावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार यांनी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांना निवेदन दिले. या निवेदनात नमूद केल्यानुसार, राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या २९ जुलै २०२५ रोजीच्या निर्णयानुसार, उमरगा-लोहारा तालुक्यातील ७९८८० हेक्टर क्षेत्रावरील शेतकरी पिकांच्या नुकसानीमुळे भरघोस नुकसान झाल्याचे नमूद आहे. या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर सरकारने ८६.४६ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्याचा निर्णय घेतला. उमरगा तालुका प्रशासनाने ३३ टक्क्यांहून अधिक पीक नुकसान झालेला अहवाल सादर न केल्याने असंख्य शेतकरी वंचित आहेत. मुरुम महसूल मंडळ हे मध्यवर्ती ठिकाण असूनही आजूबाजूच्या महसूल मंडळांना अनुदान मंजूर झाले आहे तरी आपल्या स्तरावरून मुरुम महसूल मंडळातील शेतकऱ्यांना योग्य तो न्याय द्यावा. यावेळी मंत्री मकरंद पाटील यांनी निवेदनाची दखल घेत धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्तावाची तात्काळ तपासणी करून सादर करण्याचे आदेश दिले. यामुळे अनेक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या हक्काच्या मदतीसाठी हा प्रस्ताव तातडीने शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशी मागणी करण्यात आली.

www.arambhmarathi.com

दैनिक
# आरंभ मराठी

आपलं धाराशिव

गुरूवार,दि .7 ऑगस्ट 2025

# तुळजापूरमधील वाहतुकीला शिस्त कधी लागणार? वाहतूक कोंडीने भाविक बेजार

## बेशिस्त वाहतुकीमुळे नागरिकांसह भाविकांना मनस्ताप;वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष





सुरज बागल | आरंभ मराठी

तुळजापूर –तीर्थक्षेत्र तुळजापुरात रस्त्यावर अस्ताव्यस्त वाहने लागत असल्याने भाविकांसह नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, तुळजापुरात वाहतुकीला शिस्त कधी लागणार? असा प्रश्न आता भाविकातून विचारला जात आहे. देशभरातील लाखो भाविक तुळजाभवानी चरणी माथा टेकण्यासाठी येत असतात. या भाविकांना दर्शनाच्या आनंदापेक्षा वाहतूक कोंडीच्या मनस्तापाचा त्रास जास्त सहन करावा लागतो. बेशिस्त वाहतुकीवर वाहतूक पोलिसांचे कसलेच नियंत्रण नसल्यामुळे स्थानिक नागरिकांसह बाहेरून येणाऱ्या भाविकांना देखील त्रास सहन करावा लागतो.

तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे दररोज हजारोंच्या संख्येने भाविक येतात. त्यामुळे मोठ्या संख्येने चारचाकी वाहने देखील शहरात येतात. मात्र, अनेकदा ही वाहने शहरातील रस्त्यावर बेशिस्तपणे उभी राहत असल्यामुळे इतर नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. शहरातील दीपक चौक, भवानी रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, कमान वेस, धाराशीव रोड या भागात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर वाहने उभी असतात. त्यामुळे चालत ये – जा करणाऱ्या भाविकांना व नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. तसेच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी देखील होत असते. यामुळे या वाहनधारकांवर कठोर कारवाईची गरज असून, शहरात येणाऱ्या वाहनांना शिस्तीत पार्किंग करण्याची सक्ती करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### सुरक्षारक्षक नेमकं काय काम करतात ?

भवानी रोडवर वाहने मंदिरापर्यंत जाऊ नये म्हणून लोखंडी गेट उभे केले आहेत.मात्र, या लोखंडी गेटसमोर आडवी वाहने उभी केलेली असतात. यावेळी दीपक चौकात तसेच या लोखंडी गेटवर सुरक्षारक्षक तैनात असून देखील ही वाहने उभी राहतात कशी? असा प्रश्न निर्माण होत आहे. सुरक्षा रक्षकांनीच ही वाहने अडवली तर भवानी रोडवर वाहतूक कोंडी होणार नाही.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाला वाहनांचा विळखा

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे मोठ्या प्रमाणावर अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने थांबलेली असतात. यावर कुठलीही कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या वाहनधारकांवर कारवाई का होत नाही असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक करत आहेत.

### बॅरेकेटींगचा फायदा कमी तोटा जास्त

छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून दीपक चौकापर्यंत बॅरेकटिंग करण्यात आले आहे. मात्र, हे बॅरेकेटींक अनेकदा वाऱ्यामध्ये रस्त्यावर आडवी पडत असल्याने जास्तच वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे या बॅरेकटिंगचा फायदा कमी आणि तोटा जास्त होताना दिसून येत आहे.

### वनवेची योजना बारगळली

शहरात येणाऱ्या वाहनांसाठी दीपक चौकातून वनवे करण्यात येणार होता. मात्र, त्यावर पुढे कुठलीही कारवाई झाली नसल्याने पार्किंगकडे जाणारी वाहने ही दीपक चौकातून जातात. तर बाहेर पडणारी वाहनेही तिथूनच बाहेर पडत असल्याने दीपक चौकात मोठी वाहतूक कोंडी होत असल्याचे वारंवार होत आहे. यावर उपाय म्हणून या ठिकाणी वन वे करण्याची गरज आहे. वन वे केल्यास वाहतूक कोंडीवर लगाम बसेल.

# धाराशिव येथे 'वीर परिवार सहाय्यता योजना २०२५' अंतर्गत विधी चिकित्सालय कक्षाचे आज उद्घाटन

आरंभ मराठी | धाराशिव

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (NALSA) अंतर्गत 'वीर परिवार सहाय्यता योजना २०२५' अन्वये धाराशिव येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात जिल्हा विधी चिकित्सालय कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. या कक्षाचे उद्घाटन आज (दि.७) दुपारी २ वाजता, जिल्हा न्यायालय परिसरातील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हॉलमध्ये होणार आहे. या चिकित्सालय कक्षाच्या माध्यमातून शहीद सैनिकांच्या पत्नी, पालक, सेवारत व माजी सैनिक तसेच त्यांच्या विधवांना न्यायालयीन प्रकरणांमध्ये निःशुल्क व तातडीने कायदेशीर मदत मिळणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष स्वप्निल खटी यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील वीर पत्नी, वीर माता–पिता, सेवारत व माजी सैनिक तसेच विधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव श्रीमती भाग्यश्री पाटील व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# पीएमश्री उर्दू शाळेची विद्यार्थिनी नमीरा कोरबू बीटस्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेत द्वितीय




आरंभ मराठी | तेर

तेर येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत आयोजित करण्यात आलेल्या बीट स्तरीय स्पेलींग बी स्पर्धेत पीएमश्री जिल्हा परिषद उर्दु शाळेची विद्यार्थिनी नमिता अन्सार कोरबू हिने द्वितीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. या स्पर्धेचे ५ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत दोन गटात बीट स्तरावरील विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. तेर येथील पीएमश्री जिल्हा परिषद उर्दू शाळेतील पहिल्या गटात दोन आणि दुसऱ्या गटात दोन विद्यार्थी सहभागी झाले होते. सहभागी विद्यार्थ्यांपैकी नमीरा अन्सार कोरबू इयत्ता आठवी या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. बीट स्तरावरील यशस्वी विद्यार्थ्यांना तालुकास्तरावर स्पर्धेसाठी पाठवण्यात येणार आहे.या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक तय्यबअली शहा व शिक्षक यांनी नमिराचे अभिनंदन केले. तसेच इंग्रजी विषय शिकविणाऱ्या शिक्षिका श्रीमती मुमताज खतीब यांचेही अभिनंदन करण्यात आले.

# सावरगाव प्रशालेतून सीमेवरील सैनिकांना राखी रवाना




आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथील जिल्हा परिषद प्रशालेतून भारतीय सीमेवर तैनात असलेल्या जवानांना रक्षाबंधनानिमित्त बुधवारी (दि.६) १०७ राख्या पाठविण्यात आल्या. सामान्य माणूस प्रत्येक सण आपल्या कुटुंबीयांसोबत मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा करतो. परंतु, आपल्या भारतीय सीमेवर असलेले जवान कोणताही सण आपल्या कुटुंबासोबत साजरा करू शकत नाहीत. त्याच पद्धतीने रक्षाबंधन हा सण देखील ते आपल्या कुटुंबाशिवाय साजरा करतात. त्यामुळे सावरगाव प्रशालेतील सर्व विद्यार्थिनी व महिला शिक्षक भगिनींनी या जवानांना राख्या पाठविण्याचा उपक्रम हाती घेऊन भारतीय सीमेवर तैनात असलेल्या जवानांना १०७ राख्या जिल्हा परिषद प्रशाला सावरगाव येथून पाठविण्यात आल्या. या उपक्रमासाठी शाळेतील सहशिक्षिका भारती तुपेरे, प्रियंका सूर्यवंशी, मैनाबाई पोळ व परिचरीका जया काळे यांनी परिश्रम घेतले. उपक्रम पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक रमाकांत गुरव यांनी मार्गदर्शन केले. तसेच या उपक्रमाची शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अतुल पवार, माजी अध्यक्ष रामराजे पाटील व शाळा व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांनी, गावातील पदाधिकारी, ग्रामस्थ यांनी कौतुक केले.

# तुळजापूरच्या विकासासाठी सर्वांनी सत्कार समारंभात सहभागी व्हावे

## सत्कार समितीच्या वतीने सर्व तुळजापूर शहरवासीयांना आवाहन

### घरोघरी जाऊन निमंत्रण; सर्व शहरासाठी भोजन व्यवस्था



आरंभ मराठी | तुळजापूर

तीर्थक्षेत्र तुळजापूरचा कायापालट करण्यासाठी राज्य सरकारने नुकत्याच १८६५ कोटीच्या विकासा आराखड्यास मंजुरी दिली आहे. याच अनुषंगाने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री प्रताप सरनाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तसेच या विकास आराखड्याच्या मंजुरीसाठी सतत पाठपुरावा करणारे तुळजापूरचे आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचा भव्य सत्कार तुळजापूर शहरवासीयांच्या वतीने आज (दि.७) भवानी कुंड येथे होणार आहे. या सत्काराच्या अनुषंगाने संयोजन समितीच्या वतीने बुधवारी (दि.६) पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी शहरातील सर्व नागरिकांनी यामध्ये सहभागी होण्याची विनंती संयोजन समितीच्या वतीने करण्यात आली. यावेळी स्वागताध्यक्ष बाळासाहेब शिंदे, बाळासाहेब शामराज, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, युवा नेते विनोद गंगणे तालुकाध्यक्ष आनंद कंदले आदी उपस्थित होते. तीर्थक्षेत्र तुळजापूरचा तिरुपती बालाजी, शिर्डीच्या धरतीवर विकास होणे आवश्यक असून यासाठी आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी मोठा प्रयत्न करून व पाठपुरावा करून हा विकास आराखडा मंजूर करून आणला आहे. या विकास आराखड्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांचे संयोजन समितीच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. तसेच आगामी काळात तुळजापूर तीर्थक्षेत्र हे विकसित होण्यासाठी या विकास आराखड्याच्या अनुषंगाने कामे होणार आहेत. या सत्कार सोहळ्यासाठी सर्वपक्षीय आजी माजी लोकप्रतिनिधींची आणि राजकीय नेत्यांची उपस्थिती राहणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणून महंत तुकोजी बुवा, महंत इच्छागिरी महाराज, महंत योगी मावजीनाथ बाबा, महंत चिलोजीबूवा, महंत हमरोजी बुवा, महंत व्यंकट अरण्य महाराज व महंत वाकोजी बुवा हे असणार आहेत. या सत्कार सोहळ्यासाठी शहरातील सर्व असोसिएशन, सर्व संघटना, प्रतिष्ठान, महिला बचत गट यांचीही उपस्थिती असणार आहे.

### भूसंपादनाशिवाय विकास कामे कशी होणार

माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी यावेळी म्हणाले की, आगामी काळात तीर्थक्षेत्र तुळजापूरमध्ये मोठ्या प्रमाणावर विकास कामे होणार आहेत. शहरातील व्यापारी, पुजारी तसेच नागरिकांच्या सहमतीनेच ही कामे होणार आहेत. तसेच याबद्दल कोणाला काही आक्षेप असतील तर त्यांनी याबाबत लेखी जिल्हाधिकारी किंवा आमदार राणा पाटील यांच्याकडे आपले म्हणणे द्यावे असे आवाहन त्यांनी केले. तसेच भूसंपादनाशिवाय विकास कसा होणार असेही सचिन रोचकरी यांनी यावेळी म्हटले आहे.

### संपूर्ण तुळजापूरसाठी भोजन व्यवस्था

आजच्या सत्काराच्या निमित्त संपूर्ण तुळजापूर शहर तसेच परिसरातील येणाऱ्या नागरिकांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली असून, या कार्यक्रमासाठी निमंत्रण पत्रिका देताना मानाची टोपी व टॉवेल देऊन निमंत्रण पत्रिका प्रत्येक घरोघरी जाऊन देण्यात आली आहे.

### तर राजकारणातून संन्यास घेईन

या विकास आराखड्यात विकास कामे न झाल्यास आपण राजकीय संन्यास घेणार असल्याचे विनोद गंगणे यांनी यावेळी सांगितले. तुळजापूर विकास आराखड्यात शहरात कामे न होता शहराच्या पाठीमागे कामे होत असल्याचा काही जणांचा आरोप आहे, अशी विचारणा झाल्यावर गंगणे यांनी सांगितले की, शहराच्या भौगोलिक रचनेनुसार शहराचा विकास होणारा असून, आराधवाडी भागात छत्रपती शिवाजी महाराजांची व आई तुळजाभवानीची भवानी तलवार देतानाची प्रतिमा उभी करण्यात येणार आहे. येथे मोठ्या प्रमाणावर जमीन उपलब्ध असून, त्यामुळे काही कामे करण्यात येणार असल्याचे सांगितले. आहे. या विकास आराखड्यात विकास कामे न झाल्यास आपण राजकीय संन्यास घेऊ व कोणतीही निवडणूक लढवणार नसल्याचे विनोद गंगणे यांनी यावेळी म्हंटले.

# शिराढोणच्या गायत्री कॉम्प्यूटर केंद्राचा उत्कृष्ट प्रशिक्षण केंद्र म्हणून गौरव

## संचालक अमोलसिंह चंदेल यांचा सन्मान

आरंभ मराठी | कळंब

कळंब तालूक्यातील शिराढोण येथे २२ वर्षापासून ग्रामीण विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करत असलेल्या गायत्री कॉम्प्यूटर्सची सलग दुसऱ्या वर्षी उत्कृष्ट केंद्र म्हणून निवड करण्यात आली. मंगळवारी (दि.५) छत्रपती संभाजी नगर येथे झालेल्या विभागीय बैठकीत केंद्राचे संचालक अमोलसिंह चंदेल यांचा सन्मान एम.के.सी.एल. चे व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी धाराशिव जिल्हा समन्वयक धनंजय जेवळीकर, विभागीय सल्लागार बालकिशन बलदावा, विभागीय समन्वयक गजानन कुलथे, वरीष्ठ जनरल मॅनेजर अतुल पतोडी, अमित रानडे तसेच छ.संभाजी नगर विभागातील सर्व केंद्र चालकांची उपस्थीती होती. कळंब तालूक्यातील शिराढोण येथील रहिवाशी असलेले अमोलसिंह दत्तूसिंह चंदेल यांनी सन २००३ साली शिराढोण व परीसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्याच्या उदात्त हेतूने गायत्री कॉम्प्यूटर्स या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून छोटेसे रोपटे लावले होते. आज रोजी या रोपटयाचे वटवृक्षात रुपांतर होवून शिराढोण व परीसरातील हजारो विद्यार्थी या केंद्रात प्रशिक्षण घेवून छोटे – मोठे व्यवसाय, नोकरी मिळवून आपला व कूटूंबाचा आर्थीक उत्कर्ष करत आहेत. सलग २२ वर्षापासून प्रतिकूल परीस्थीतीवर मात करत केंद्राचे संचालक अमोलसिंह चंदेल यांनी शिराढोण व परीसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्याचे काम अविरतपणे सूरु ठेवले आहे. शिराढोण येथील शेतकरी कूटूंबातील अमोलसिंह चंदेल यांनी भविष्यात मानवाच्या दैनंदिन व्यवहारात संगणकाच्या माध्यमातून माहिती व तंत्रज्ञानाचा करावा लागणारा वापर व त्याची व्याप्ती लक्षात घेता आपल्या स्वतःच्या गावात, आपल्या परीसरातील विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान अवगत व्हावे यासाठी सन २००३ साली गायत्री कॉम्प्युटर या नावाने संगणक प्रशिक्षण केंद्राची स्थापना



केली होती. याचा फायदा बाहेर गावी शिक्षणासाठी जाउ न शकणा–या ग्रामीण विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात होत आहे. या संगणक प्रशिक्षण केंद्रात ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण प्रशिक्षण मिळावे यासाठी केंद्राचे संचालक अमोलसिंह चंदेल यांच्यासह शिक्षीका आशा भोरे, अवधुत पाटील, महेश पानढवळे हे सातत्याने प्रयत्नशिल असतात.

ग्रामीण भागातील सर्वोत्कृष्ट प्रशिक्षण केंद्र म्हणून यावर्षी एमकेसिएल तर्फे सलग दूस–या वर्षी गायत्री कॉम्प्यूटर्सचा सन्मान करण्यात आला. या बद्दल शिराढोण व परीसरातील पालक, विद्यार्थी यांच्या तर्फे प्रशिक्षण केंद्राचे अभिनंदन होत आहे.

# येणेगूर येथील कॅप्टन जोशी स्मारक विद्यालयात पालक मेळावा उत्साहात




आरंभ मराठी | येणेगूर

उमरगा तालुक्यातील येणेगूर येथील कॅप्टन जोशी स्मारक विद्यालयात बुधवारी (दि.६) पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक महेश हरके, प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते माजी ग्रामपंचायत सदस्य सिद्धेश्वर हिप्परगे,सामाजिक कार्यकर्ते प्रशांत पोचापुरे,संचालक आनंदराज बिराजदार उपस्थित होते. या पालक मेळाव्यामध्ये विविध विषयावर चर्चा करण्यात आली. तसेच या मेळाव्यामध्ये विविध समित्या गठीत करण्यात आल्या. शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सिद्धेश्वर हिप्परगे व उपाध्यक्षपदी प्रशांत पोचापुरे यांची सर्व पालकांच्या संमतीने निवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी पालक प्रतिनिधी बसय्या स्वामी, शिवकुमार स्वामी, संतोष स्वामी, मल्लिनाथ हुळमजगे,सत्तार मुल्ला, इत्यादी अनेक पालकांच्या संमतीने समिती गठीत करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख गोपाळ गेडाम यांनी केले. पालक मेळावा यशस्वी करण्यासाठी शिक्षक शंकर हुळमजगे, महेश खंडाळकर, सौरभ उटगे, व्यंकट बिराजदार,चंद्रकांत बिराजदार, गोविंद मेंडिबणे,अप्पू मुदकण्णा,पार्वती जगताप, कालिंदी भाले,कोमल कीर्तने,प्रवीण स्वामी,सुरेश जाधव,अविनाश दुनगे,सुप्रिया झिंगाडे सर्व शिक्षक शिक्षकेतर व पालक आदी उपस्थित होते.